# <u>जाहिरात</u>

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सर्व विभागामध्ये मानद तत्वावर समुपदेशक पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापीठाची/संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A.Psychology) M.S.W. अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य. |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय / निमशासकीय / मोठ्या संस्थांमधील किमान ०२ वर्षाचा अनुभव. |
| इतर अटी व शर्ती | रा.प. महामंडळाच्या विभागामध्ये आवश्यकतेनुसार समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणुक करण्यात येईल व त्या करिता मासिक मानधन ४,०००/- देण्यात येईल. प्रथम ०१ वर्षासाठी सदर पदी मानद तत्वावर नेमणुक देण्यात येईल. सदर कालावधीत कामाचा आढावा घेवून पुढे सदर नेमणुक चालु ठेवायची किंवा नाही हे ठरविण्यात येईल. |
| कर्तव्य | रा.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांचे समुपदेशनाव्दारे मानसिक ताणतणावाचे निवारण करणे, त्यांच्याशी वैयक्तीक संवाद साधुन, अडीअडचणी समजाऊन घेवून वैयक्तीक पातळीवर निराकरण करणे व आवश्यक वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचारांची गरज निदर्शनास आणून देणे, तसेच आगारास महिन्यातुन किमान ०३ वेळा भेट देणे. |
| नेमणुकीचा कालावधी | सदर नेमणुक निव्वळ मानद तत्वावर असुन नेमणुकीचा कालावधी एका वर्षाचा राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाचा कार्यकाळ विचारात घेवून नेमणुकीचा कालावधी संबंधीत विभागामार्फत वाढविण्यात येईल. सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचा/सामावून घेण्याचे वा नियमीत सेवेचे ईतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार/हक्क अर्जदारास/समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी/नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| अर्ज करण्याची पध्दत | वरिल अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवाराने फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखीत करुन स्वत:चा फोटो त्यावर चिकटवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याबाबतचा दाखला, शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र व अनुभव दाखला जोडावा. सदर अर्ज आपण समुपदेशक म्हणून काम करण्यास इच्छुक असल्यास रा.प. नागपूर विभाग नियंत्रकाच्या नावे विभागीय कार्यालय, रा. प. नागपूर येथे दि. २४.०६.२०२४ पर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावा. या बाबत अधिक माहिती करिता विभाग नियंत्रक, रा.प. नागपूर, मुख्य बसस्थानकाच्या मागे, जुने प्रादेशिक कार्यालय, जावध चौक, नागपूर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. |